# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

**-: प्रेस नोट :-** दिनांक - २८/११/२०२४

**<u>मुंबई शहरात मेफेड्रॉन (एम. डी.) या अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या ०१ नायजेरियन महिला आरोपीस अटक करुन ७० लाख रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त.</u>**

| | | |
|---|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | :- | ७०/२०२४ कलम ८ (क) सह २२(क) एन. डी. पी. एस. ॲक्ट- १९८५ सह कलम १४अ, (ब) परदेशी नागरीक कायदा - १९४६. |
| **दाखल दिनांक** | :- | दिनांक २६/११/२०२४ रोजी |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | वाय एम. सी. ए. रोड, आग्रीपाडा, मुंबई |
| **आरोपीची संख्या** | :- | ०१ |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | :- | एकुण रू. ७० लाख मुल्याचा ३५० ग्रॅम वजनाचा 'एम.डी.' हा अंमली पदार्थ |

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट चे पथक मुंबई शहरातील अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे, पुरवठा, साठा करणारे इसमांचा शोध घेत असताना पथकास वाय एम. सी. ए. रोड, आग्रीपाडा, मुंबई या ठिकाणी संशयास्पदरित्या वावरत असलेल्या एक परदेशी महिला नामे इमा स्टेला उर्फ ट्रेझर पिटर, वय ३४ वर्षे हिला अटकाव करून तिची झडती घेतली असता तिच्याकडे ३५० ग्रॅम वजनाचा 'एम.डी' हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या अंमली पदार्थाची आंतरराष्ट्रीय बाजारभावाप्रमाणे अंदाजे रु. ७०,००,०००/- एवढे मुल्य आहे. तसेच तपासामध्ये सदरची परदेशी महिला बेकायदेशीररित्या भारत देशामध्ये वास्तव्य करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. अमंली पदार्थासह ताब्यात घेतलेल्या परदेशी महिलेविरुध्द एनडीपीएस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद करुन तिला अटक करण्यात आलेली आहे.

अशा प्रकारे 'अंमली पदार्थमुक्त समाज' बनविण्याचे दृष्टीने बृहन्मुंबई पोलीस दल सतत प्रयत्नशील आहे. सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, श्री. शाम घुगे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष श्री. सुधीर हिरडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रभारी पोलीस निरीक्षक संतोष साळुंखे यांचे नेतृत्वाखाली वरळी युनीट यांनी केली आहे.

------------//-------------